| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | | २३/०४/२०२६ |
| नोंदणी दिनांक | – | २३/०४/२०२६ |
| निकाल दिनांक | – | ०२/०७/२०२६ |
| कालावधी | – | वर्षे महिने दिवस |
| | | – ०२ ०९ |

**सिंधुदुर्ग – ओरोस येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात मु. ओरोस.**

(श्री.एस.टी.त्रिपाठी, अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे समोर )

**फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. २९/२०२६ निशाण क्र.१४**

**सी एन.आर.क्र. – एमएचएसआय ०१–०००४१७२०२६**

श्री. ओंकार पंढरीनाथ सुर्वे,
वय – १८ वर्षे, धंदा – शिक्षण,
रा. सुर्वेवाडी, नेले, ता. वैभववाडी,
जि.सिंधुदुर्ग. } अर्जदार

**विरुध्द**

१. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिंधुदुर्ग
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,
सिंधुदुर्ग.
२. पोलीस निरीक्षक – वैभववाडी, पोलीस
ठाणे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग. } सामनेवाले.

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३८ व ४४०**

**अन्वेय रिव्हीजन**

==================================

अर्जदार तर्फे विधिज्ञ – श्री. वाय.आर.खानोलकर,

उत्तरवादी तर्फे अति.जिल्हा सरकारी वकील – श्री.आर.व्ही.देसाई.

===================================

**– न्या य नि र्ण य –**

(जाहीर केला दिनांक ०२ जुलै, २०२६)

प्रस्तुतचा रिव्हीजन अर्ज चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ मध्ये दि.२१/०४/२०२६ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १३० प्रमाणे दिलेल्या कारणे दाखवा नोटीस व अंतरिम बंधपत्र आव्हानीत करुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३८ व ४४० अन्वेय रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे.

रिव्हीजन अर्जातील थोडक्यात मजकूर खालील प्रमाणे –

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी अर्जदार यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १३० प्रमाणे पाठविलेली कारणे दाखवा नोटीस ही बेकायदेशीर आहे. सदर नोटीस विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी न्यायीक विचार केलेला नसून त्यांनी अत्यंत मोठी चूक केलेली आहे. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे अर्जदार यांनी सार्वजनिक शांततेचा भंग केला असे दाखविणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, असे असतानाही कारणे दाखवा नोटीस पाठविणेत आली आहे. त्यानंतर अर्जदार यांच्याकडून कोणतीही चौकशी न करताच जबरदस्तीने दि.२१/०४/२०२६ रोजी अंतरिम बंधपत्र घेण्यात आले. सदरची नोटीस ही केवळ राजकीय दबावापोटी पाठविणेत आलेली आहे. कार्यकारी

दंडाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १३०,१३२ आणि १३३ या मधील अनिवार्य तरतुदींचा विचार केलेला नाही.

३. तथाकथित गुन्हा माहे जुलै –२०२५ मध्ये घडलेला आहे. आणि एफआयआर क्र. १६/२०२४ दि. १६/०३/२०२६ रोजी दाखल करणेत आलेला आहे. तसेच चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ चे कामी दि.२१/०४/२०२६ रोजी अर्जदार यांचेकडून अंतरिम बंधपत्र घेण्यात आले. अर्जदार त्यावेळी अज्ञान होता. त्यामुळे विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी सदरची कारवाई बेकायदेशीरपणे केलेली आहे. त्यामुळे नोटीस व बंधपत्र हे रद्दबातल ठरविण्यात यावे व रिव्हीजन अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती अर्जदाराचे वकीलांनी केलेली आहे .

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि असलेली वस्तुस्थिती यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविले आहेत ते खालील प्रमाणे–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चॅप्टर केस क्र ०६/२०२६ मध्ये केलेला कारणे दाखवा नोटीसीचा आदेश योग्य, कायदेशीर आणि बरोबर आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी पारित केलेल्या आदेशात फेरबदल करण्याची आवश्यकता आहे काय? | होय. |
| ३ | अंतिम आदेश काय | सदरचा रिव्हीजन अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## – कारणमिमांसा –

### मुद्दे क्र.१ व २ करिता –

५. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादचे अनुषंगाने सर्वप्रथम विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चॅप्टर केस क्र ०६/२०२६ मध्ये केलेल्या कारणे दाखवा नोटीसचे अवलोकन करण्यात आले. या नोटीसीचे अवलोकन करता असे दिसते की, कार्यकारी दंडाधिकारी, यांनी मुख्यत्वेकरुन असे म्हटलेले आहे की, त्यांनी संबंधींचा अहवाल व इतर कागदपत्रे वाचून खात्री झाल्याने आपल्या गुन्हेगारी कृत्याला आळा बसून वर्तणूक सुधारावी याकरिता या करिता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १२९(ग) अन्वये खटला दाखल करुन त्याची कार्यवाही सुरु झालेली आहे व त्या कार्यवाहीस उत्तर देणे संदर्भात अर्जदारांना हजर राहणेबाबत फर्माविणेत आले आहे. त्यामुळे नोटीसीच्या कथनातून हे स्पष्ट आहे की, सदरच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने उत्तर देण्यास कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे व अंतरिम बंधपत्र अर्जदारांनी दिलेले आहे. त्यामुळे सदरची नोटीस ही संभाषणात्मक (Interlocutory) आदेश आहे किंवा कसे हे सर्व प्रथम पाहणे गरजेचे आहे.

६. या संदर्भात 2018 Cri.L.J. 1188 M.Krishnamurthy and ors. Vs. Sub–Divisional Magistrate–cum Revenue and Anr. तसेच . Allahabad High Court – Salim @ Tundal and Others Vs. State of U.P.and Others on 3 August, 2012 या न्यायनिवाडयांचा आधार घेणे न्यायोचित ठरेल. या न्यायनिवाडयाचा विचार करता कार्यकारी दंडाधिकारी यांनी पारित केलेले आव्हानीत आदेश हे संभाषणात्मक असल्यामुळे या अनुसार फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ अथवा भारतीय राज्यघटना अनुच्छेद २२७(१) खालीच दाद मागणे न्यायोचित आहे. सबब या कारणांवरुन सदरचा रिव्हीजन अर्ज विचारात घेता येणार नाही.

७. तसेच तथाकथित गुन्हा माहे जुलै –२०२५ मध्ये घडलेला आहे. आणि एफआयआर क्र. १६/२०२४ दि. १६/०३/२०२६ रोजी दाखल करणेत आलेला आहे. चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ चे कामी दि.२१/०४/२०२६ रोजी अर्जदार यांचेकडून अंतरिम बंधपत्र घेण्यात आले. अर्जदारांनी त्याच्या वयाचा पुराव्याचे अवलोकनार्थ नि.क्र.१२ नुसार त्याच्या जन्माच्या दाखल्याची सत्यप्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्याची जन्मतारीख २९/०९/२००७ अशी नमूद आहे. म्हणजे दि.२१/०४/२०२६ रोजी चॅप्टर केस क्र.०६/२०२६ दाखल दिवशी त्याचे वय फक्त १७ वर्षे, १० महिने एवढे होते. याअर्थी अर्जदार त्यावेळी अज्ञान होता. त्यामुळे विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी सदरची कारवाई पुर्णपणे बेकायदेशीर केली आहे. म्हणून नोटीस व अंतरिम बंधपत्र व चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ हे रद्दबातल ठरविण्यास पात्र आहे.

८. वरील कारणास्वत प्रस्तुत कामी दाखल झालेला रिव्हीजन अर्ज रद्द होणेस पात्र आहे. करिता मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी

नोंदविणेत येत आहे. तसेच विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी पारित केलेल्या आदेशात फेरबदल करण्याची आवश्यकता आहे. म्हणून मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी देणेत येत आहे व मुद्दा क्र. ३ चे निष्कषार्थ पुढील प्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा रिव्हीजन अर्ज मंजूर करणेत येत आहे .

२. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ मध्ये दि.२१/०४/२०२६ रोजी पारित केलेला आदेश सदरची नोटीस व अंतरिम बंधपत्र रद्द करुन सदरची चॅप्टर केस क्र. ०६/२०२६ निकाली करणेत येत आहे.

३. येणे प्रमाणे रिव्हीजन अर्ज निकाली करणेत येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात जाहीर.)

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.07.02 18:41:26 +0530

दि.०२/०७/२०२६ ( एस.टी. त्रिपाठी )
सिंधुदुर्ग – ओरोस अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग – ओरोस.